एक दिवसीय राष्ट्रीय परिषद

(स्वयं अर्थसहाय्यित)

# जागतिकीकरणाचे मराठी भाषा आणि साहित्यापुढील आव्हाने व उपाय

आयोजक

## मराठी विभाग

श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळ, येलदरी (कॅम्प) द्वारा संचलीत

(भाषिक अल्पसंख्यांक (मारवाडी) दर्जा प्राप्त)

# तोषणीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

सेनगांव जि. हिंगोली (महाराष्ट्र) - ४३१५४२



संयोजक

प्रा. डॉ. अंजली. द. टापरे

मराठी विभाग

समन्वयक

प्रा.उत्तम. पुं. सुपारे

मराठी विभाग प्रमुख

प्रा.श्रीपाद. ग. तळणीकर

प्र. प्राचार्य

# अनुक्रमणिका

Gramin (A.C.S.) Mahavidyalaya, Vasantnagar (Kotgyal) Ta. Mukhed Dist. Nanded College


| अ.क्र. | शिर्षक | लेखकाचे नांव | पान क्र. |
|---|---|---|---|
| 1 | जागतिकीकरण : भाषा, साहित्य आणि संस्कृती | प्रा.डॉ.मा. मा. जाधव | 9 |
| 2 | जागतिकिकरण आणि मराठी कविता : एक आकलन | प्रा. डॉ. वी. वी. खंदारे | 12 |
| 3 | जागतिकीकरणात मराठी भाषेसमोरील आव्हाने आणि उपाय | प्रा. डॉ. जयद्रथ जाधव, | 15 |
| 4 | मराठवाडी बोली अभ्यासाच्या दिशा | डॉ. विठ्ठल जंबाले | 21 |
| 5 | बदलत्या काळातील बोलीभाषा : आव्हाने व उपाय | डॉ. वैजनाथ अनमुलवाड, | 23 |
| 6 | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | प्रा.डॉ.रेखा जगनाळे, | 27 |
| 7 | जागतिकीकरणाचे मराठी भाषा आणि साहित्यापुढील आव्हाने व उपाय | अस्मिता विश्वनाथ वांद्रे, | 34 |
| 8 | जागतिकीकरणाच्या युगात मराठी माध्यमातील मुलांना इंग्रजी बोलताना येत असलेल्या अडचणींचा चिकित्सक अभ्यास | डॉ. शामसुंदर गुळभिले | 41 |
| 9 | जागतिकीकरण आणि ग्रामीण साहित्य | डॉ. सपना वाल्मीक सोनवणे | 50 |
| 10 | जागतिकीकरणाच्या वावटळीतील बलुतेदाराची व्यथा | | |
| 11 | मांडणारा कवी : अरुण काळे | प्रा.डॉ. यशपाल भिंगे | 53 |
| 12 | जागतिकीकरणाचा मराठी ग्रामीण कवितेवर प्रभाव | प्रा. डॉ. डिगोळे विठ्ठलराव | 53 |
| 13 | जागतिकीकरण आणि नव्वदीनंतरची मराठी कविता।। | डॉ. केशव पाटील | 59 |
| 14 | जागतिकीकरणानंतरच्या शैक्षणिक पडझडीची कविता : पोरग शेकत बसलय | प्रा.डॉ.संजय कसाव, | 65 |
| 16 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | प्रा.डॉ. नवीन के. गिलबिले | 69 |
| 17 | जागतिकीकरण : मराठी भाषेची स्थिती, आव्हाने व उपाय | डॉ.रामकिशन नारायण दहिफळे | 72 |
| 18 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | प्रा.डॉ. चंद्रकांत शेरखाने | 75 |
| 19 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | डॉ.सुरेश शिंदे | 79 |
| 20 | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | प्रा.डॉ. राजेश धनजकर | 82 |
| 21 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | प्रा. डॉ. मुंढे संगीता | 85 |
| 22 | मराठी भाषेची सद्यःस्थिती आव्हाने आणि उपाय | प्रा.डॉ. शेषराव नाईकवाडे | 88 |
| 23 | जगतिकीकरण आणि आदिवासी लोकसाहित्य | प्रा. डॉ. पंडित शिंदे | 90 |
| 24 | 'तुडवण ' आणि शोषणाचे जागतिकीकरण | प्रा.डॉ. राम रौनेकर, | 94 |
| 25 | जागतिकीकरण आणि कादंबरी | प्रा.डॉ. पंडित रानमाळ, | 96 |
| 26 | जागतिकीकरणाचा मराठी साहित्यावरील प्रभाव | डॉ.प्रभाकर ना. कऱ्हाळे | 98 |
| 27 | जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर बदलती महानगरीय मराठी कविता | प्रा.डॉ. जगताप यु. एस. | 101 |
| 28 | जागतिकिकरणाचे सदर्भ अचुकपणे टिपणारी कविता महाजन यांचा 'ग्राफिटी वॉल': एक आकलन | प्रा. डॉ. शारदा कदम<br>डॉ. कविता लोहाळे | 104 |
| 29 | जागतिकिकरण आणि मराठी कविता | प्रा.डॉ.गजानन आनंता देवकर , | 107 |
| 30 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | प्रा. डॉ. गणपती मोरे | 111 |
| 31 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | प्रा.डॉ.एल.डी.गलांडे | 113 |
| 32 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | डॉ.कालीदास गुडदे | 116 |
| 33 | जागतिकीकरणआणिमराठीसाहित्य | प्रा. इंगळे के.एस. | 118 |
| 34 | जागतिकीकरण आणि मराठी कादंबरी | डॉ.शंकर विभुते | 123 |
| 35 | जागतिकीकरणाच्या उंबरठ्यावरील कृषी जाणीवा | प्रा. डॉ. दुष्यंत कटारे | 125 |
| 36 | 2000 नंतरची मराठी ग्रामिण कादंबरी : एक अभ्यास | प्रा.कृष्णा काशिराम कोटकर | 128 |
| 37 | जागतिकीकरण आणि दलित कविता : एक अभ्यास | प्रा. मारोती गायकवाड | 132 |
| 38 | मराठी भाषेची सद्यःस्थिती, आव्हाने व उपाय नेहा | रतन वनसोडे | 137 |

# जागतिकिकरणाचे संदर्भ अचुकपणे टिपणारी कविता महाजन यांचा 'ग्राफिटी वॉल': एक आकलन

प्रा. डॉ. शारदा कदम
(मराठी विभाग)
बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत

डॉ. कविता लोहाळे
मराठी विभाग
ग्रामीण महाविद्यालय, वसंतनगर, कोटग्याळ

Gramin (A.C.S.) Mahavidyalaya, Vasantnagar (Kot.) Ta. Mukhed Dist. Nanded College Code 117

1991 पासून भारतामध्ये जागतिकिकरण आले असे आपण म्हणतो, परंतु ही प्रक्रिया स्वातंत्र्यपूर्व काळापासून अंतस्थरूपात वाटचाल करीत होती. विविध देशानी एकमेकांशी व्यापार करता यावा म्हणून आपली फाटके उघडी ठेवावीत एव्हढ्यापूरतीच जागतिकिकरणाचे स्वरूप नाहिच तसे असेलच तर अगदी प्राचीन काळापासूनची तशी आपल्या देशासंदर्भातली व्यापाराची उदाहरणे देता येतील हे असे नाही. जागतिकिकरण ही आधुनिक अर्थशास्त्रीय संकल्पना आहे. केवळ एकमेकांशी व्यापार करणं एव्हढ्यापूरती ही संकल्पना नाही तर संपूर्ण विश्व समाज बाजारमूलक बनवणारी ही संकल्पना आहे आणि याचा परिणाम जीवनाच्या सर्वच स्थरावर होतांना दिसतो. साहित्य हा त्यातलाच एक महत्त्वाचा भाग किंवा घटक आहे.

आज समाजमानसिकतेत झपाट्याने बदल होतांना दिसतात. मानवी नाते हे 'वापरा आणि फेका' इतक्या तांत्रिकतेकडे झुकतांना दिसते आहे. शहरातील चंगळवादी जीवनात क्षणोक्षणी हे संदर्भ सापडतात. शेतीचे काही खरे नाही, शिकून काही उपयोग नाही व पैशाशिवाय किंमत नाही याची जाणीव ग्रामीण समाजाला घेरून टाकते आहे. जीवनातील परंपरागत स्थिर मूल्य ढासळत आहेत. याचा परिणाम जीवनाच्या सर्वच क्षेत्रावर होऊ लागला आहे. औद्योगिकरणाने शहरांना जन्म दिला आणि हळूहळू शहरांनी जीवन पद्धतीत मूल्यात, समाज व निसर्ग समाज व संस्कृती समाज व व्यक्ती यांच्या पारंपरिक नात्यात धक्कादायक बदल घडवून आणले. शहरामुळे समूहाच्या आकारात अघटित वाढ झाली आणि समाजातल्या घटकाच्या पूर्वीच्या स्वरुपातही बदल झाला. या नव्या जीवनपद्धतीचे भयंकर आणि विद्रूप परिणाम सर्वच क्षेत्रात दिसतात.

**जागतिकिकरण संकल्पना :**

'जागतिकिकरण' ही संकल्पना स्पष्ट करणाऱ्या अनेक अभ्यासकानी प्रयत्न केला. त्यात डॉ. झांबरे–पिंपळपूरे म्हणतात, "जागतिकिकरण म्हणजे व्यापार वित्त, रोजगार, तंत्रज्ञान, दळण–वळण, विदेशी स्थलांतर, पर्यावरण, राहणी, फॅशन, समाजव्यवस्था, संस्कृती अशा सर्व प्रकारच्या क्षेत्रामधून होत राहणारे रुपांतर होय."[1]

यावरून जागतिकिकरणाची व्याप्ती स्पष्ट होते. जागतिकिकरणात व्यक्ती ही एक वयाची स्वतंत्र व्यक्तिमत्व असणारी असू शकत नाही. ती ही या पर्यावरणाचा भाग बनते. सभोवतालच्या यंत्रीकिकरणाचाच एक भाग बनत असते. पुढे अभ्यासक डॉ. झामरे म्हणतात, "जागतिकिकरण म्हणजे वस्तु, सेवा व आंतरराष्ट्रीय भांडवल प्रवाह अतिजलद व प्रसारण पावणारे तंत्रज्ञान यांचे वाढते प्रमाण तसेच विविधता यांच्या साह्याने जगातील देशांचे सतत वाढत जाणारे परस्परावलवित्त्व होय."[2]

नॅशनल युनिव्हर्सिटी फॉर एज्युकेशन प्लानिंग ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन (NUFEPA) यांच्या एका अहवालानुसार गेल्या काही वर्षांमध्ये इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये अभुतपूर्व वाढ झाली आहे. नकळत याचा परिणाम भाषा, जीवनमान व इतरही क्षेत्रांवर पडतांना दिसतो.

"जागतिकिकरण, मुक्त अर्थव्यवस्था, ग्लोबल व्हिलेज यांसारख्या संकल्पनांमधून नव भांडवलशाही संपूर्ण जगावर अधिसत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत आहे. प्रचंड भांडवली शक्तीशाली बहुराष्ट्रीय कंपन्या, आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था, प्रसारमाध्यमे, अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञान, वेगवान संपर्क माध्यमे, रोजगारांच्या नानाविध संधी यासारख्या असंख्य घटकांमधून नव भांडवलशाही प्रणीत एक भाषा, एक अर्थव्यवस्था, एक जग या सारख्या कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी अनेक पातळ्यांवर प्रयत्न होत आहेत. इंग्रजी ज्ञान व्यवहारांची, संधीची, रोजगाराची भाषा बनली आहे. बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेत इंग्रजीचा बोलबाला असल्याने सामान्य जनसमूह इंग्रजीकडे वेगाने वळत आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश आदि राज्यांमध्ये इंग्रजी शिक्षणावरून मोठे वाद होतांना दिसतात. मागास, ग्रामीण जनसमूहाच्याकडून इंग्रजीचे स्वागत केले जात आहे. खेड्यांमध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळा मोठ्या प्रमाणात

निघत आहेत. वर्तमान स्पर्धात्मक जगात बोलीभाषांचा व्यवहारिक उपयोग नसल्याने त्यांच्याकडे दुर्लक्षितपणे पाहिले जात आहे. भाषेचे सांस्कृतिक मूल्य मागे पडत आहे."[३]

यावरून जागतिकिकरण संकल्पना स्पष्ट होते. जागतिकिकरणाची व्याप्ती स्पष्ट होतांना जागतिकिकरणाचे परिणाम सर्वच क्षेत्रात बरे–वाईट उमटतात. साहित्य हा जीवनाचा आरसा असतो. जीवनाच, जगण्याचे प्रतिबिंब साहित्य उमटत असतं. 1990 च्या दशकानंतर जागतिकिकरणाचे परिणाम जनमाणसावर उमटतांना दिसतात. जागतिकिकरणाच्या रेट्यामुळे बकाल होत जाणारं मानवी जीवन, त्याच्यातली वैफल्यग्रस्तता अनेक लेखक–कवींनी आपल्या लेखणीमधून सातत्याने आणि ताकदिने मांडली. त्यातलीच एक महत्त्वाची लेखिका कवयित्री म्हणून कविता महाजन यांचे नाव घ्यावे लागते.

कविता महाजन यांनी 'ब्र', 'भिन्न' ह्या कादंबऱ्या लिहिल्या. त्यांची 'कुहु' ही मुलांसाठीची गाजलेली कलाकृती आहे. त्यांचा 'धुळीचा आवाज' हा कविता संग्रह प्रकाशित झाला. त्यांचा 'ग्राफिटी वॉल' हा ग्रंथ 2009 साली प्रकाशित झाला असून 2013 पर्यंत यांच्या तीन आवृत्त्या प्रकाशित झाल्या असून प्रस्तुत ग्रंथामधून लेकिखकेने सडेतोडपणे लेखन केलेले दिसते. दैनंदिन जीवनात येणारे अनुभव कथन करत असतांना लेखिका वर्तमान जीवनाचे संदर्भ अधोरेखित करते. बदलणाऱ्या जीवन वर्तुळात हाडामासाचा माणूस हा किड्यामुंग्यासारखा भरडतो. त्याच अस्तित्व हे त्याच उरत नाही. नित्याचा भाकरीचा प्रश्न सोडवतांना त्याने पत्करलेली चाकरी ही त्याचा 'कणा' शिल्लक ठेवत नाही. जागतिकिकरणाच्या प्रचंड मोठ्या प्रवाहाचाही एक भाग बनतो आणि लादलेल पाठीवरच ओझ 'टार्गेट कम्प्लेट' करण्याच्या नादात त्यांचा यंत्र कधी बनतो हे त्याचे त्यालाच कळत नाही. तो गाव, घर, नात्या–गोत्याच्याही पुढे निघून जातो. तो, त्याच काम आणि काम पूर्ण करणार यंत्र एवढच शिल्लक राहत. मग मानवी नाती, नात्यातला ओलावा गळून पडत जातो. 'युज ॲण्ड थ्रो' ही संकल्पना घेवून तो वावरत असतो. ही त्याची वैफल्यग्रस्त पोकळी लेखिका कवयित्री कविता महाजन यांनी अत्यंत चपखलपणे त्यांच्या 'ग्राफिटी वॉल' मधून मांडली. आपल्या 'तात्पुरते' या कवितेत त्या म्हणतात –

नाहीतरी या जगात काय असतं
कायस्वरूपी ?
एका क्षणात आलो
दुसऱ्या क्षणात गेलो
दोन क्षणाच्या मधल्या दोरीवर
थोडं लोंबकळत जगलो
अखेर आजच्या काळात
सारे संबंध
कॉण्डोम लावलेले"[४]

याच ग्राफिटी वॉलमध्ये लेखिका बदलत जाणारे स्त्री–जीवनाचे संदर्भ अधोरेखित करते. बदलत्या काळानुसार स्त्री–पुरुषातलं नाते ही कृत्रिम झाले. साऱ्या नात्या–गोत्याच्या पुढे जावून संवेदनाहीन बनलेला माणसांचा समूह दृष्टीपथात येतो. जिथे पूर्वापार चालत आलेले संदर्भ बदलून जातात. स्त्री मग तिचे सगळेच सांस्कृतिक संदर्भ बदलायला लागतात. माजघरातल्या रमणारी शतकानुशतके प्रथा परंपरेच्या आड दडलेली प्रचंड कतृत्व असूनही व्यवस्थेच्या निर्दयी हत्याराने दुबळी बनवलेली स्त्री जागतिकिकरणसत मात्र आपली बोट कम्प्युटरच्या किबोर्डवर, कारच्या स्टेअरींगवर सराईतपणे वावरते आणि आपल्या मूलभूत प्रश्नांवर चिंतन करते. आपल्या 'एकच हेतू निवडावा' या लेखामध्ये लेखिका कविता महाजन म्हणतात – "लग्न का करायचं, तर सगळे करतात म्हणून जोडीदार पाहिजे म्हणून, समाजमान्य वंशवृद्धीसाठी, हुंडा वा नोकरी–व्यवसाय (पोरीच्या बापाकडून) पाहिजे म्हणूनकृ असे कितीतरी हेतू सापडतात. अनेक मुलीही केवळ अन्न, वस्त्र, निवाऱ्याची कायमस्वरूपी सोय व्हावी म्हणून लग्न करतात."[५]

प्रस्तुत संदर्भावरून जागतिकिकरणाने माणसाला एकिकडे यंत्रवत बनवल असल तरी याच जागतिकिकरणात माणसाला स्वातंत्र्याने जगण्याच विचार चिंतनाच बळ दिलेल दिसतो. तो खोलवर जावून मानवी प्रश्नांशी भिडतांना दिसतो. जागतिकिकरणातली स्त्री तर अधिकच ठामपणे व्यक्त होतांना दिसते. जागतिकिकरणाने कुटुंबव्यवस्था

खिळखिळी झालेली आहे असे वरवर दिसत असले तरी ही सुधारण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, हे ही मान्य करायलाच हवं. आपल्या एका लेखामध्ये लेखिका समाजाच विदारक वास्तव मांडते.

'मुंबईत राहयची जागा लहान असते. घरात जागा लहान असते. घरात जास्त माणसं मावत नाहीत, लेकरंसुद्धा एखादंच होऊ देतात. मग म्हाताऱ्यांची अडगळ होणारच. वध्दाश्रमांचे चोचले, पैसेवाल्यांचे ते त्यांना परवडत नाहीत त्यांनी काय करायच? घराबाहेर तर काढून टाकता येत नाहीत. नातलग, शेजारी–पाजारी नांव ठेवतील. आजकाल मरणही पटकन येत नाही. पोरांची तरी काय चुक? त्यांनी त्यांची आयुष्य जगायची की आमची दुखणी निस्तरायची? खर्च पुढच्या पिढीवर करायचा की ज्याचा कुणालाच काही उपयोग राहिला नाही अशा म्हाताऱ्यांवर करायचा? देव दर्शनाला म्हणून घेऊन येतात आणि गर्दीत सोडून निघून जातात. आम्हाला घराचा पत्ता माहीत नसतो असं नसंत पण जिथ ना माणसांच्या मनात जागा आहे ना घरातकृ.. तिथं जाऊन तरी काय करायच?'[५]

निष्कर्ष :

1. जगतिकिकरणाचे परिणाम सर्वव्यापी झाले असून त्याचे पडसाद सर्वच क्षेत्रात उमटतांना दिसतात.
2. जागतिकिकरणानंतर विशेषतः स्त्रियांच्या अभिव्यक्तिमध्ये अधिक स्पष्टता आणि व्यापकता आलेली दिसते.
3. कविता महाजन यांचे लेखन अनेक अर्थाने वाचकाला अंतर्मुख करते आणि जागतिकिकरणानंतर झालेले मानवी जीवनाचे बरे-वाईट संदर्भ निःसंदिग्धतेने टिपते.

संदर्भग्रंथ सूची :


1. भारतीय अर्थशास्त्र – डॉ. झांबरे–पिंपळापूरे, नागपूर प्रकाशन, प्रथम आवत्ती 2003, पृ. 40
2. कित्ता, पृ. 40–41
3. HRD Ministry (Government of India) in dine Language, www.mhrd.org
4. ग्राफिटी वॉल–कविता महाजन, प्रकाशक दिलीप माजगावकर, राजहंस प्रकाशन पुणे, तिसरी आवृत्ती 2013,पृ. 44
5. कित्ता, पृ. 137
6. कित्ता, पृ. 154



( Dr. Haridas Rathod )
Principal
Gramin Arts, Comm. & Science
Mahavidyalaya, Vasantnagar (Kotgyal)
[illegible] Dist. N[illegible] (M.S)